# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 04.12.2025** **वार- गुरुवार**

---

**स्मार्ट इंडिया हॅकेथॉन**

राष्ट्रीय स्तरावरील स्मार्ट इंडिया हॅकेथॉन 2025 स्पर्धेची महाअंतिम फेरी पुण्यात होणार आहे. इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी इथं येत्या सोमवारी सकाळी 8 ते मंगळवारी रात्री 8 अशी सलग 36 तास ही हॅकेथॉन चालेल. केंद्रीय शिक्षण मंत्रालय, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद आणि नवोन्मेष विभागाच्या वतीनं 2017 पासून या स्पर्धेचं आयोजन केलं जातं. यंदाच्या अंतिम फेरीत देशभरातील 25 संघ सहभागी होणार आहेत. संस्थेच्या प्राचार्या डॉ. वैशाली पाटील यांनी आज पत्रकार परिषदेत हि माहिती दिली.

**दीक्षांत सोहळा**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, भारतीय सैन्याच्या खांद्याला खांदा लावून पुढे जात आहे, असं प्रतिपादन परिषदेचे अध्यक्ष प्राध्यापक टी जी सिताराम यांनी आज पुण्यात केलं. सैन्य अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या दीक्षांत सोहळ्यात ते बोलत होते. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेनं 100 हून अधिक महाविद्यालयात संरक्षण तंत्रज्ञान या विषयाचे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. क्वांटम तंत्रज्ञान, शस्त्र अभियांत्रिकी, सायबर तंत्रज्ञान या विषयांचे पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केले आहेत, अशी माहिती सीताराम यांनी दिली. विकसित भारत ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी देशात उत्पादन वाढवणे आवश्यक असून सहावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना उत्पादन कौशल्य शिकवण्याचा निर्णय अभियांत्रिकी तंत्रशिक्षण परिषदेने घेतला असल्याचं त्यांनी सांगितलं. यावेळी अभियांत्रिकीच्या पदवी अभ्यासक्रम आणि तांत्रिक अभ्यासक्रमाच्या स्नातकाना पदवी प्रदान करण्यात आली. स्थापत्य शाखेसाठी कॅप्टन जितेंद्र चहर यांना, इलेक्ट्रिकल शाखेसाठी कॅप्टन हिमांशु कुमार, स्थापत्य शाखेसाठी लेफ्टनंट अंश चौहान, मेकॅनिकल शाखेसाठी लेफ्टनंट आर्यन चौहान यांना सुवर्ण पदक प्रदान करण्यात आले. महाविद्यालयाचे कमांडंट लेफ्टनंट जनरल ए के रमेश यावेळी उपस्थित होते.

**शेतकरी सुविधा केंद्र**

राज्य सरकारच्या कृषी समृद्धी योजनेतंर्गत राज्यात पाच हजार कोटी रुपये अनुदान देऊन विविध योजना राबवण्यात येणार आहेत. त्यातून सुमारे 2 हजार 778 शेतकरी सुविधा केंद्रे गाव पातळीवर लवकरच स्थापन करण्यात येणार आहेत. त्यासाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन करून, समितीची बैठक आयोजित करण्याच्या सूचना कृषी आयुक्तालयातील संचालक सुनील बोरकर यांनी दिल्या आहेत.

**दत्तजयंती**

दत्त जयंतीचा उत्सव आज पुण्यात अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. शहरातील विविध दत्त मंदिरांमध्ये या निमित्त धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. सर्वच छोट्या मोठ्या दत्त मंदिरांमध्ये भाविकांनी सकाळपासूनच दर्शनासाठी गर्दी केली आहे.

**आरएसएस**
राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते गेली शंभर वर्षे समाजासाठी आणि देशासाठी निःस्वार्थपणे काम करत आहेत, या कार्यामुळेच संघाबद्दल समाजामध्ये विश्वास निर्माण झाला आहे, असं प्रतिपादन संघाच्या अखिल भारतीय धर्मजागरण कार्याचे समन्वयक शरदराव ढोले यांनी आज पुण्यात केलं. धर्मजागरण कार्याचं अखिल भारतीय कार्यालय पुण्यात बांधलं जाणार आहे, या प्रकल्पाचं भूमिपूजन ढोले यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते.

**प्रदर्शन**
पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या 86व्या वर्धापन दिनानिमित्त वृत्तपत्रांमधील छायाचित्रकारांनी काढलेल्या छायाचित्राचं प्रदर्शन बालगंधर्व कलादालनात भरवण्यात आलं आहे. मुंबईचे छायाचित्रकार प्रशांत नाकवे यांच्या हस्ते आज या प्रदर्शनाचं उद्घाटन झालं. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे सर्वच क्षेत्रात आव्हानं निर्माण होत असून ती स्वीकारण्यासाठी छायाचित्रकारांनी तयार असायला हवं असं प्रशांत नाकवे यावेळी म्हणाले. हे प्रदर्शन येत्या 6 डिसेंबरपर्यंत सकाळी दहा ते रात्री आठ या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुलं असेल.

**हरितसेतू**
पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्रस्तावित हरित सेतू प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्ष तोड करण्यात येणार आहे. त्यामुळे महापालिकेच्या या प्रकल्पाला निगडी प्राधिकरण रेसिडेंट फोरम फाउंडेशननं विरोध केला असून हरित सेतू प्रकल्प रद्द करण्याची मागणी केली आहे. प्रकल्पासाठी विकास कामं करताना वृक्षतोड केली जाणार नाही असं आश्वासन महापालिका प्रशासनानं दिलं आहे.

**Pcmc**
पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागानं 17 नोव्हेंबर ते 2 डिसेंबर या कालावधीत राबवलेल्या कुष्ठरोग शोध मोहीमेत 11 रुग्णांना कुष्ठरोग असल्याचं निदान झालं. या रुग्णांना तत्काळ प्राथमिक औषधोपचार देण्यात आले असून पुढच्या उपचारांसाठी मार्गदर्शनही करण्यात आलं.

**हवामान**
पुणे आणि परिसरात आज किमान तापमान 12 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं, उद्याही साधारणपणे असंच तापमान राहण्याचा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार.**